**वेळ : ३ तास** **गुण : १००**

---

**सूचना :** *१. सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.*
*२. उजवीकडील अंक गुण दर्शवितात.*

प्रश्न १. (अ) आनंदवर्धनाच्या ध्वनिसिद्धान्ताचा सविस्तर परामर्श घ्या. (२०)

किंवा

(आ) भारतीय साहित्यशास्त्रातील क्षेमेंद्राच्या औचित्यविचाराची सविस्तर चर्चा करा.

प्रश्न २. (अ) भारतीय साहित्यशास्त्रातील भरतमुनींचे नाट्यविषयक रसविवेचन विशद करा. (२०)

किंवा

(आ) अभिनवगुप्ताची रसास्वादविषयक उपपत्ती सविस्तर सांगा.

प्रश्न ३. (अ) शब्दशक्ती म्हणजे काय ते सांगून, 'अभिधा' व 'लक्षणा' शब्दशक्तीचे विवेचन करा. (२०)

किंवा

(आ) काव्यरचनेतील 'वृत्त' व 'मुक्तछंद' या संकल्पनांची गुणवैशिष्ट्ये आणि मर्यादांचा परामर्श घ्या.

प्रश्न ४. (अ) साहित्यनिर्मितीच्या केंद्रस्थानी असलेल्या 'प्रतिभाशक्ती'ची स्वरूपवैशिष्ट्ये स्पष्ट करा. (२०)

किंवा

(आ) 'साहित्य प्रयोजन' ही संकल्पना स्पष्ट करून, मम्मटाने सांगितलेल्या साहित्यप्रयोजनांची चर्चा करा.

प्रश्न ५. टिपा लिहा (कोणत्याही दोन) (२०)

१) कुंतकाचा वक्रोक्तिविचार.
२) भट्टनायकाचे रसविवेचन.
३) व्यंजना शब्दशक्ती.
४) साहित्याच्या निर्मितीप्रक्रियेतील 'व्युत्पत्ती'चे स्थान.

---



4ABE02B93AAEA20AB4B9CE19432791E8